# झुकेरबर्गची साक्ष! या युगातील दिलासा!

‘फेसबूक’चा संस्थापक मार्क झुकेरबर्ग हा कदाचित जगातील सर्वात शक्तिमान व्यक्ती असावा. कारण त्याच्याकडे जगभरातील अब्जावधी व्यक्तींचा तपशील आहे. जाहिरातींपासून निवडणुकीपर्यंत सर्वत्र या तपशीलाला जबरदस्त मागणी आहे आणि म्हणूनच झुकेरबर्ग शक्तिशाली आहे. त्याच्या वैयक्तिक अब्जावधीच्या संपत्तीपेक्षा ही डाटाची संपत्ती सत्ता गाजवणारी आहे. सत्ता आणि संपत्ती जिथे एकत्र येते, तिथे लोकशाहीची मान मुरडत कायद्याचा गळा घोटण्याची सैतानी कृत्येही घडतात. एक माणूस जेव्हा इतरांपेक्षा वरचढ ठरतो तेव्हा लोकशाही धोक्यात येते. अशावेळी न्याय व्यवस्था, प्रशासन आणि प्रसिद्धीमाध्यमे यांची जबाबदारी वाढते. लोकशाहीचे हे वरील तीन स्तंभ लोकशाही टिकवतात की दलदलीत रूतवतात यावर त्या देशाचे भवितव्य अवलंबून असते. बहुसंख्य काय म्हणतात ते ऐकणे म्हणजे लोकशाही नव्हे, तर एक माणूस काय म्हणतो त्याचे ऐकून घेणे म्हणजे लोकशाही, असे महात्मा गांधी म्हणत असत. त्याचबरोबर कायदा आणि प्रशासन यापुढे सर्व समान असणे म्हणजे खरी लोकशाही असेही महात्मा गांधी सांगत असत. ‘फेसबूक’चा झुकेरबर्ग आणि अमेरिकेने त्याच्यासंबंधी केलेली कारवाई हे या कारणासाठीच लोकशाहीचे उत्तम उदाहरण आहे. झुकेरबर्ग हा शक्तिशाली माणूस अमेरिकन काँग्रेसपुढे साक्ष देण्यास बसला आहे, हे या युगातील लोकशाहीचे सर्वोत्तम छायाचित्र आहे.

**संपादकीय**
**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

‘फेसबूक’वरील माहिती विकली गेली असा आरोप झाला आणि जगभरात खळबळ उडाली. ही माहिती निवडणूक प्रचार प्रक्रियेसाठी वापरली गेली हे त्याहून अधिक धक्कादायक ठरले. जगभरात या विरोधात आवाज उठू लागला. अनेकांनी निषेध म्हणून आपले फेसबूक अकाऊंट डिलिट करण्यास सुरुवात केली. हे सर्व फेसबूकसाठी तापदायक होते. तरी परिस्थिती आवाक्याबाहेर गेलेली नव्हती. फेसबूक अकाऊंट डिलिट करणाऱ्यांची संख्या अल्प होती. फेसबूकशिवाय करियर आणि मनोरंजन या दोन्ही गोष्टी अशक्य आहेत, असे ज्यांना वाटते त्यांची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे या वादळाने जरी धडका दिला तरी फेसबूक तरणार होते. काही काळाने हे वादळ शांत झालेच असते. त्यात झुकेरबर्गची आर्थिक ताकद आणि पकड कमी नव्हती. या ताकदीने काय काय विकत मिळते, याची कल्पना सहज करता येईल. पण ही ताकद चालली नाही. अमेरिकन काँग्रेसने झुकेरबर्गला चौकशीसाठी बोलावले.



सुरुवातीला झुकेरबर्ग चौकशीला हजर झाला नाही. त्याने लेखी माफीनामा पाठवून दिला. पण त्याला नोटीस बजावून काँग्रेससमोर हजर राहण्यास सांगितले. मार्क झुकेरबर्ग अमेरिकन काँग्रेसपुढे हजर झाला. त्याला स्वत: साक्ष द्यावी लागली. ही साक्षही ‘इन कॅमेरा’ म्हणत गुप्त ठेवली नाही तर जगासमोर याचा व्हिडीओ आला. झुकेरबर्गने गुन्ह्याची कबुली दिल्यावर काँग्रेसमधील प्रतिनिधींनी त्याला सतत पाच तास बेधडक प्रश्न विचारले. फेसबूक डाटा चोरला जातो आहे हे माहीत नव्हतं का? या डाटाचा निवडणुकीत उपयोग झाला का? डाटा चोरला जात असल्याचे कळल्यावर तू काय केलेस? पुन्हा डाटा चोरला जाऊ नये याची काय दखल घेशील? अशा प्रश्नांचा भडिमार करण्यात आला.

हे दृश्यच आनंददायी होतं. झुकेरबर्गची मानहानी किंवा प्रश्नांबद्दल येणारे विचार हे या आनंदाचे कारण नाही. हे दृश्य पाहून आनंद यासाठी आहे की, एका बलवान व्यक्तीने चूक केल्यावर इतरांप्रमाणे त्यालाही चौकशीला सामोरे जावे लागते. त्याची नि:पक्षपाती चौकशी होते याचे प्रत्यक्ष उदाहरण सर्वांना दिसले. अमेरिकन लोकशाही सुदृढ असल्याचे हे लक्षण आहे. लोकशाही बळकट झाली तर मनुष्य जीवन सुसह्य होईल. हुकूमशाहीत हे कधीही घडू शकत नाही, हे इतिहास सांगतो. स्वत:च्या नावाचा कोट शिवणाऱ्या हुकूमशहापेक्षा सर्वांना समान न्याय देणारी व्यवस्थाच चिरकाल टिकते.